# बोलणे शिकावे लागते

## वाचादोष व उपचार

डॉ सुजाता मोरे चव्हाण

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# बोलणे शिकावे लागते

## डॉ. सुजाता मोरे चव्हाण

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# बोलणे शिकावे लागते

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# बोलणे शिकावे लागते

लेखिका : डॉ. सुजाता मोरे चव्हाण
९८६७९३४१०८-
Email : drsujatachavan61@gmail.com

मुखपृष्ठ : चैतन्य चव्हाण

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : ३० जून २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# <u>बोलणे शिकावे लागते</u>

# ( वाचादोष व उपचार)

## डॉ. सुजाता मोरे चव्हाण

# प्रस्तावना

आपले मूल जसजसे मोठे होत असते तसतसे ते विविध गोष्टी शिकत असते. पहिल्या रडण्याने श्वासोश्वास सुरु होतो. हळूहळू आपल्या विविध अवयवांची जाणिव व ओळख बाळास होत जाते. 'बोलणं' हे आपोआप येत नाही. ते पण बाळ शिकत असते. पण हे शिक्षण नकळत होते, त्यामुळे आपल्याला ते लक्षात येतेच असे नाही. सतत कानावर पडणारी भाषा बाळ आत्मसात करते. पण कधीकधी मूल बोलत नाही. न बोलणे हा दोष उपचारांनी दूर करता येतो.

वाचादोषांची कारणे विविध असू शकतात. त्यावर आज स्पीच थेरपी उपलब्ध आहे. जेवढे लवकर आपण उपचार सुरु करु तेवढे चांगले असते. ह्या सर्वांची माहिती आपण ह्या पुस्तकाद्वारे करुन घेणार आहोत.

ह्या उपचार पद्धती साठी चिकाटी लागते. उपचार पद्धतीचा काळ जास्त असू शकतो. त्यामुळे न कंटाळता जिद्दीने त्यामागे

लागून ती चालू ठेवणे हे मोठे कठीण काम असते. म्हणून पालकांना हे आव्हान ठरु शकते. पालकांनी त्या उपचारपद्धतीत सहभाग घेणेही गरजेचे असते. बाळाकडून घरी हे उपचार करून घेणे, ह्यावर त्यांचे परिणाम खूप प्रमाणात अवलंबून असतात.

पालकांच्या सहकार्याने व सातत्याने संयम ठेवून केलेल्या उपचारपद्धतीचे रिझल्ट्स खूप चांगले मिळतात.

बऱ्याचदा ह्या दोषांबद्दल माहिती नसते. तसेच कोठे विचारायचे हे पण माहित नसते. काही वेळा घरच्या वृद्ध मंडळींच्या मते, "मुल थोडे मोठे झाले की बोलेल आपोआप."असा सल्ला मिळतो. ह्यात बाळाचे वय वाढत जाते. कधीकधीतर डॉक्टर मंडळींनासुद्धा ह्याचे गांभिर्य समजून येत नाही, आणि मग ह्या दोषांकडे कानाडोळा केला जातो. पण पालकांनो, वेळीच सावध व्हा. वेळीच उपचार सुरु करा म्हणजे बाळातील हे वाचादोष पूर्णत: नाहिसे होण्याची शक्यता वाढते.

ह्या वाचादोषांची कारणे जशी वेगवेगळी आहेत, तसेच त्याचे प्रकार वेगवेगळे आहेत. सर्व दोषावर उपचार पद्धतीचा कालावधी पण  बदलत असतो.

ह्या पुस्तकात बाळाच्या वाचादोषांबद्दल तपशीलवार चर्चा करत आहे. पक्षघाताने वा मोठेपणी काही कारणांनी होणाऱ्या वाचादोषांवर मात्र जास्त तपशिलवार देत नाही. कारण त्याची कारणे तसेच उपचारपद्धती वेगवेगळी असते. त्यामुळे त्याबद्दल तूर्तास येथे लिहित नाही.

ह्या पुस्तकात सोप्या भाषेत पालकांना मार्गदर्शक ठरेल असे विवचन देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. आशा आहे कि हे पुस्तक सर्वांना उपयुक्त ठरेल. शहरात वाचादोषांवर उपचारपद्धती उपलब्ध असते, मात्र खेडोपाडी वा गावांत अशी मदत मिळणे कठीण जाते. अशावेळी ह्या पुस्तकाद्वारे अशा बाळाच्या पालकांना ही माहिती उपयोगी ठरावी. हा विचार मनात ठेवून घरच्या घरी काही उपचार चालू ठेवता यावे, यासाठी उपचारांची माहिती दिलेली आहे.

गावी जर असे तज्ञ नसतील, तर अशावेळी मला वाटते की शहरांत अशा तज्ञांकडून त्या दोषाबद्दल निदान करून उपचारांची माहिती करुन घ्यावी व नंतर घरी हे उपचार चालू ठेवून सहा महिने वा वर्षातून एकदा तज्ञांची भेट घेत राहिल्यास अशी बालके उपचारांपासून वंचित रहाणार नाहीत. मी स्वत: अश्याप्रकारे

कित्येक बालकांना मदत देऊ शकले आहे व त्यांचे चांगले परीणामही मला अनुभवास आले. अशा पालकांना उपचारांदरम्यान काही समस्या असल्यास फोनवर त्यांच्या शंकांचे निरसन करता येते, जेणेकरुन उपचारांमध्ये खंड पडत नाही. पण ह्या सर्व चांगल्या परीणामांचे सर्व श्रेय त्यांच्या पालकांना जाते. त्यांच्या चिकाटी व संयमामुळेच हे साध्य होऊ शकते.

ह्या पुस्तकाचे मुखपृष्ठ चैतन्य चव्हाण यांचे आहे , त्यांचे मी आभार मानते. तसेच पुस्तकात वापरलेले फोटोज् हे ज्या बालकांचे आहेत त्यांचे पण मी आभार मानते.

आपणापर्यंत माझे हे लिखाण पोहोचवणारे ई साहित्य प्रतिष्ठानची मी आभारी आहे. आपल्या सर्वांना हे पुस्तक आवडेल व उपयुक्त ठरेल अशी आशा करते.

२२ मे २०२१
डॉ. सुजाता मोरे चव्हाण

# अनुक्रमणिका

प्रकरण पहिले : माझे मुल अजून का बोलत नाही?

प्रकरण दुसरे : बोलण्याची क्रिया

प्रकरण तिसरे : वाचा दोषावर उपचार पद्धती

# प्रकरण १

## माझे मुल अजून का बोलत नाही?

आपण नवीन नवीन भाषा किंवा शब्द आयुष्यभर शिकत असतो. पण आपल्याला काय सांगायचे आहे ह्या गरजेपुरती भाषा मुल साधारणपणे पहिल्या तीन वर्षात शिकते. ऐकू येण्यासाठी कानाची वाढ गर्भावस्थेतच होत असते. साधारणपणे पाच महिन्याच्या गर्भाचे कान पूर्णपणे तयार होतात व नंतर बाळ आजूबाजूचे आवाज ऐकू शकते. एखादा मोठा आवाज झाला की बाळ दचकते. जन्मानंतर सुद्धा वेगवेगळे आवाज ऐकून बाळ काही न काही प्रतिसाद देत असते. कधी कधी आवाजाने बाळ गप्प होते वा रडू लागते. नंतर बाळ जवळच्या व्यक्तींचे आवाज ओळखू लागते. साधारणपणे पाच-सहा महिन्याचे बाळ स्वत: आवाज काढण्यास सुरुवात करते. ह्या आवाजांना तसा काही अर्थ नसतो. पण स्वत: आवाज काढून ते स्वत: ऐकत असते. खरेतर ह्यावेळी बाळाच्या मेंदूत ह्या आवाजाची नोंद होत असते. नंतर साधारण

नऊ-दहा महिन्याचे बाळ पंखा दाखव, लाईट दाखव अशा प्रश्नांच्या उत्तरासाठी त्यावस्तूकडे नजर टाकते. एक वर्षाच्या वयाच्या वेळी साधारणपणे एक शब्द बोलता येऊ लागतो. जसे की, आई, बाबा, मामा, काका, बॉल, पाणी इत्यादी. ह्यावेळी बाळाची शब्दसंपदा साधारण शंभरावर गेलेली असते. ह्यानंतर दोन किंवा तीन शब्दांची रचना करण्याचा प्रयत्न मुल करु लागते. जसे कि, मला खाऊ दे, बॉल दे, पाणी दे.

ह्या काळात जर मुल सभोवतालचे बोलणे सतत ऐकत असेल तर ते लवकर बोलणे शिकते. शिवाय बाळ जेव्हा काही बोलते तेव्हा त्याला प्रोत्साहन देणे पण उपयोगी ठरते. सभोवताली बोलली जाणारी भाषा मुल अशाप्रकारे शिकत असते.

मुलाच्या बौद्धिक वाढीचा संबंध भाषा शिकण्याशी असतो हे लक्षात घेणे गरजेचे ठरते. त्याचप्रमाणे मुल हे सर्व ऐकून ऐकून शिकत असते म्हणजेच श्रवणशक्ती व बोलणे शिकणे ह्यांचा पण घनिष्ठ संबंध असतो हे पण लक्षात ठेवावे.

साधारणत: जन्मानंतर तीन महिन्यांपर्यंत मोठा आवाज झाला की मुल दचकते किंवा झोपेतून जागे होते. असे जर होत नसेल तर बाळाची श्रवणशक्तीची चाचणी करून घेणे गरजेचे ठरते.

बोलण्यासाठी आपण बरेच अवयव वापरत असतो. जसे की, जीभ, ओठ, दात, टाळू, पडजीभ, स्वरयंत्र, स्वर नलिका व फुफ्फुसे. फुफ्फुसांतून हवा वापरली जाते. प्रत्येक अक्षराच्या वेळी वेगवेगळ्या प्रकारे ह्या अवयवांच्या हालचाली केल्या जातात.

ही अवयवे तर महत्त्वाची आहेतच पण त्याहून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे ह्या सर्वांवर नियंत्रण ठेवणारा मेंदू.

ठराविक उच्चार येण्यासाठी सगळ्या वाचा अवयवांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्याचे काम मेंदू करत असतो. ह्या अवयवांचा योग्य समन्वय साधणे, त्यांवर नियंत्रण ठेवणे त्याचबरोबर भाषेचे नियम लक्षात ठेवणे हे सर्व काम मेंदू सतत करीत असतो.

एक एक अक्षर उच्चारले तरी दोन अक्षरे एकत्रपणे उच्चारणे, नंतर दोन शब्द एकत्र करणे, मोठमोठी वाक्ये तयार करणे हे

टप्प्याटप्प्याने शिकले जाते. शिवाय प्रत्येक भाषेचे व्याकरण सुद्धा शिकावे लागते. आपला मेंदू हे सर्व साठवत असतो व योग्यवेळी योग्य ते आदेश देत असतो.

एकंदरीत बोलणे व भाषा शिकणे ही प्रक्रिया दिसते तेवढी सोपी नक्कीच नसते. वाचा अवयवांची हालचाल व त्यांच्यात सुसंगतता असावी लागते. ह्या सर्वांवर अधिकार गाजवणारा व नियंत्रण ठेवणारा आपला मेंदू सतत कार्यरत असतो. आपल्या कानावर पडलेला आवाज मेंदूतील केंद्रात पोहचून त्याचा अर्थ लावला जातो व हा अर्थ लावण्यासाठी पूर्वी त्याबाबत आपल्याला ज्ञान झालेले असते आणि ती माहिती मेंदूत साठवलेली असते. आपण अर्थ लावून त्यावर प्रतिक्रिया देण्यासाठी उत्तर देतो तेव्हा त्याची रचनापण मेंदूतील केंद्राद्वारे केली जाते व त्याप्रमाणे आपल्या वाचेच्या अवयवांची हालचाल होते.

हे सर्व सुरळीत चालले तर आपल्याला बोलण्यासंबंधी काही समस्या अनुभवास येत नाहीत. पण ह्या सर्व गणितात कोणत्याही टप्प्याला काही दोष असेल तर त्याची परिणती वाचादोषात दिसून

येते. म्हणजे बोलता न येणे किंवा अशुद्ध बोलणे ह्या मागे विविध कारणे असू शकतात. आपण आता काही कारणे समजून घेउया.

## १. श्रवणदोष :

आपण ऐकतो आणि बोलायला शिकतो. म्हणजेच जर ऐकू आले नाही तर बोलायला शिकणे अवघड होणार. आपण ऐकून ते मेंदूत पोहचवतो व त्याचे आकलन होते. कानाद्वारे आपण ध्वनी ऐकतो. कान बाहेरुन दिसतो तेवढाच नसतो. तर, बाहेरचा कान, कानाचा पडदा, मधला कान व आतील कान हे सर्व मिळून कान बनतो. शिवाय मेंदूला कान जोडला जातो तो ऐकण्याच्या नसे मार्फत.

मधला कान, कानाच्या पडद्या नंतर असतो. मधल्या कानात एक हवेची पोकळी असते व ही पोकळी एका नळीने नाकाला जोडलेली असते, जेणेकरून कानातली हवा खेळती राहू शकते. मधल्या कानात तीन लहान हाडांची साखळी असते. बाहेरचा कान आतल्या कानाशी मधल्या कानाने जोडलेला असतो. कानाच्या


पडद्यावर पडणारा आवाज मधल्या कानातल्या ह्या तीन लहान हाडांच्या साखळीद्वारे आतल्या कानात पोहोचवला जातो.

आतला कान गोगलगाईच्या शंखांसारखा असतो. ह्या कानात ध्वनीलहरींचे रुपांतर विद्युतलहरीत केले जाते, व या लहरी कानाच्या नसेच्या मार्फत मेंदूपर्यंत पोहचवल्या जातात.

बाहेरच्या कानात वा आतल्या कानात वा मधल्या कानात कोणतेही दोष असतील तर ऐकण्याची क्रिया नीट होणार नाही. ह्या सर्व ऐकण्याच्या क्रियेत ज्या पातळीला दोष असेल त्यानुसार त्याचे परिणाम दिसून येतात व उपचार पद्धती सुद्धा त्यानुसार ठरते. आवाजाची तीव्रता/पातळी डेसिबल मध्ये मोजली जाते. आपला आवाज हळू/मोठा होतो त्याप्रमाणे डेसीबल बदलतात. सहसा कुजबुजण्याचा आवाज हा २०-२५ डेसीबल एवढा असतो. तर आपल्या नेहमीच्या बोलण्याचा आवाज ४० ते ६० डेसीबल एवढा असतो. मोठ्याने बोलल्या/ओरडल्यास तो ८० डेसीबल पर्यंत जातो. फटाक्यांचा आवाज १०० ते १२० डेसीबल एवढा असतो. आवाजाची शक्ती अश्याप्रकारे डेसिबल मध्ये मोजता येते.

त्याचप्रमाणे आवाजाची पट्टी हर्ट्स मध्ये मोजतात. आपले कान २० ते २०,००० हर्ट्स पर्यंतचे आवाज ऐकू शकतात.

खालील आकृतीत कानाचे तीन भाग दाखवले आहेत.



डोळ्याच्या दृष्टीसाठी जसा नंबर काढतात तसे कानाने जर नीट ऐकू येत नसेल तर कानाची श्रवणशक्ती किती आहे ह्याची चाचणी करता येते. जसा डोळ्याला चष्मा लावला की समोरचे स्पष्ट दिसते तसे कानात यंत्र लावल्यावर ऐकू येणे शक्य होते. पण चष्मा व श्रवणयंत्रामध्ये फरक असतो. श्रवणयंत्राद्वारे ऐकण्याची सवय करावी लागते. तसेच श्रवणयंत्र लावल्यावर सर्वच आवाज ऐकू येणे सुरु होते. म्हणून गोंगाटाच्या जागी त्रास होण्याचा संभव असतो. त्यामुळे श्रवणयंत्र लावले की ते वापरायला पण शिकून घ्यावे लागते व त्याची सवय करावी लागते. मुलाच्या कानात हे श्रवणयंत्र नीट बसावे यासाठी त्याच्या कानाच्या मापाचे ईयर मोल्ड बनवावे लागतात, व मुल जसजसे वाढते तसे हे ईयर गोल्ड बदलावे लागतात.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, दोन्ही कानांची श्रवणशक्ती वेगवेगळी असू शकते. म्हणून दोन्ही कानांची तपासणी करुन घेऊन त्यानुसार उपचार करवून घ्यावेत. बहिरेपणा सर्वसाधारणपणे लक्षात येतो, पण जर कमी ऐकू येत असेल तर त्याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. म्हणून पालकांनी आपले मुल नीट ऐकू शकते आहे ना ह्याची खात्री करुन घ्यावी.

बहिरेपणामुळे बऱ्याचदा मुल बोलायला शिकत नाही. पण जरी कमी ऐकू येत असेल तरीही बोलणे अशुद्ध होणे वा इतर वाचादोष होण्याची संभावना असते. म्हणून याकडे वेळीच लक्ष देणे गरजेचे ठरते.

## २. बुद्धीमत्ता दोष :

मतिमंद मुलांच्या मेंदूतील पेशींची संख्या व वाढ इतर मुलांपेक्षा कमी वेगाने होते. किंवा पेशींच्या जुळण्या एकमेकांशी कमी प्रमाणात होतात. त्यावर औषध नाही. पालकांना अशी मुले सांभाळण्याचे आव्हान असते व बऱ्याचदा हे पालक खचून जातात. पण पालकांकडून अशावेळी सत्यस्थितीचा स्वीकार करून प्रयत्न वादी विचारसरणीची आवश्यकता असते.

मतिमंद मुलांचे केवळ बोलणेच मागे पडते असे नाही तर सर्वच क्रियांमध्ये (जसे की चालणे-बोलणे-इतरांशी संवाद साधणे-शारिरीक क्रिया करणे) मंदत्व आढळून येते. यासाठी वेळीच बालरोग तज्ञांचा सल्ला घेणे हितावह ठरते.

बोलणे शिकण्यासाठी आकलनशक्ती व स्मरणशक्ती यांचा वापर होतो. आपण भाषा ऐकतो, समजतो व लक्षात ठेवतो. मतिमंद मुलांच्या बाबतीत शब्दसंपदा खूप कमी आढळते. ते बोलताना बोबडे-तोतरे बोलतांना आढळतात. बोलण्यासाठी लागणाऱ्या अवयवांची हालचाल योग्य प्रमाणात होत नाही, परिणामी वाचा दोष आढळून येतात.

### ३. ऑटीझम (स्वमग्नता):

हा मज्जासंस्थेचा विकार आहे. ह्या आजाराची लक्षणे खूप वेगवेगळ्या प्रकारची असतात. बहुतेक वेळा अशी मुले स्वत:च्या दुनियेत मग्न असतात. काही जण (Hyperactive) सतत हालचाल करणारे असतात. सर्व साधारणपणे ही मुले नजरेला नजर (Eye contact) देत नाहीत. त्यांची स्वत:ची एक भाषा असते. आपल्याला ती चमत्कारिक वाटते. अशा मुलांसाठी मानसोपचार तज्ञांचा सल्ला घेणे योग्य ठरते.

## ४. सेरेब्रल पाल्सी :

आपण पाहिले की बोलण्यासाठी आपल्याला विविध अवयवांची गरज असते. बोलतांना स्नायूंची योग्य हालचाल करणे आवश्यक असते. ह्या स्नायूंचे केंद्रस्थान मेंदूमध्ये असते. ह्या केंद्रात जर काही इजा झाली तर अवयवांतील संतुलनावर परिणाम होतो. ह्यामुळे बोलतांना अवयवांची हालचाल संथपणे होते वा योग्यप्रकारे होत नाही. त्यामुळे वाचा दोष आढळून येतात.

वर काही ठळक कारणे दिलेली आहेत. पण त्याव्यतिरिक्त इतरही काही कारणांमुळे वाचादोष आढळून येतात. आपण पाहिले की, बोलणे हे शिकावे लागते. त्यामुळे जर हे शिकण्यासाठी वातावरण उपलब्ध नसेल तर वाचा दोष आढळून येतो. मुल बोलायला शिकतांना प्रथम आवाज काढायला शिकते, नंतर एक शब्द बोलायला लागते. मग एक एक वाक्य शिकते व नंतर वेगवेगळे शब्द शिकून त्याची शब्दसंपदा वाढते.


# प्रकरण २

# बोलण्याची क्रिया


## बोलण्यासाठी विविध अवयवांचा उपयोग केला जातो.

वाचा अवयवांची हालचाल व त्यांच्यात सुसंगतता असावी लागते. ह्या सर्वांवर अधिकार गाजवणारा व नियंत्रण ठेवणारा आपला मेंदू सतत कार्यरत असतो. आपल्या कानावर पडलेला आवाज मेंदूतील केंद्रात पोहचून त्याचा अर्थ लावला जातो व हा अर्थ लावण्यासाठी पूर्वी त्याबाबत आपल्याला ज्ञान झालेले असते आणि ती माहिती मेंदूत साठवलेली असते. आपण अर्थ लावून त्यावर प्रतिक्रिया देण्यासाठी उत्तर देतो तेव्हा त्याची रचनापण मेंदूतील केंद्राद्वारे केली जाते व त्याप्रमाणे आपल्या वाचेच्या अवयवांची हालचाल होते. आपण आपले ओठ, जीभ, दात ह्यांचा वापर बोलतांना करतो. ठराविक शब्दोच्चार यासाठी ठराविक प्रकारे त्या अवयवांची हलचाल केली जाते. पण जर ह्या पैकी कोणत्याही अवयवात काही बिघाड असला तर त्याचे परिणाम बोलण्याच्या प्रक्रियेवर होतो.

खालील आकृतीत बोलण्यासाठी वापरले जाणारे अवयव दाखवले आहेत.




1. टाळू
2. नाकातील पोकळी
3. ओठ
4. दात
5. जीभ
6. तोंडाची पोकळी
7. घसा
8. स्वरयंत्र
9. श्वासनलिका



## ओठ आणि टाळू ह्याचे व्यंग म्हणजे काय?

ओठ आणि टाळू कापलेला अथवा दुभंगलेला असणे म्हणजेच त्यात व्यंग असणे ही अवस्था मुले व मुली ह्यापैकी कोणातही आढळून येते. गर्भावस्थेत असतांना गर्भाची वाढ होत असतांना टाळू व ओठ ह्यांच्या वेगवेगळया भागांची जुळणी होत नाही किंवा अयोग्य रितीने होते, त्यामुळे जन्मत:च अशा प्रकारचे व्यंग आढळून येते. कधी कधी फक्त टाळुचा भाग जोडला न गेल्याने तेथे छिद्र दिसते; तर कधी टाळूपासून ओठापर्यंत पूर्णत: दुभंगलेले दिसून येते. हे विभाजन एकाच बाजूस अथवा मध्यावर किंवा दोन्ही बाजूस दिसून येते.


आपण वरील आकृतीत बघितले की बोलण्यासाठी विविध अवयवांची सुसंगत हालचाल केली जाते. पण समजा ओठ फाटलेला असेल तर ठरावीक अक्षरे शुद्ध बोलणे शक्य होत नाही. टाळूत भोक असेल तर हवा नाकावाटे बाहेर जाते व बोलण्यात अनुनासिक स्वर येतो.

अश्यावेळी शारिरीक दुरुस्ती शस्त्रक्रियेने केली जाते व नंतर वाचा तज्ञांकडून उपचार घ्यावे लागतात.


पुठे काही आकृत्या व छायाचित्रे देत आहे.

जन्मत: असणारे हे व्यंग कधी कधी लक्षात येत नाही. मुल दूध पितांना ते नाकावाटे बाहेर येणे, मुल बोलायला न लागणे, आवाज किनरा (नाकातून) येणे, अशा काही तक्रारी दिसून येतात. अशावेळी लवकरात लवकर वैद्यकिय सल्ला घेणे आवश्यक असते.


आकृत्यांमध्ये पहिल्या आकृतीत निर्दोष ओठ व टाळू कसे असतात हे दाखविले आहे, तर त्यानंतरच्या सर्व आकृत्यांद्वारे वेगवेगळ्या प्रकारची व्यंगे कशी काय असतात हे दाखवले आहे. ओठ आणि / अथवा टाळू ह्यांतील व्यंग व शस्य्रक्रियेनंतर ते पूर्णत: बरे झाल्यानंतरची स्थिती ही पुढील छायाचित्रांत दाखविलेली आहे.





आकृती 1: 1. ओठ 2. दात 3. टाळू 4. पडजीभ 5. जीभ




निर्दोष ओठ / टाळू





आकृती 5: 1. ओठ 2. दात 3. टाळू 4. पडजीभ
5. जीभ




टाळूला छोटे छिद्र दिसत आहे




आकृती 2: 1. ओठ 2. दात 3. टाळू 4. पडजीभ
5. जीभ




टाळूच्या दोन्ही बाजूला विभाजन दिसत आहे




आकृती 3:

टाळूच्या एका बाजूला ओठा पर्यन्त
विभाजन दिसत आहे

**1. ओठ 2. दात 3. टाळू 4. पडजीभ 5. जीभ**




आकृती ४: फक्त टाळूचे विभाजन
दिसत आहे

**1. ओठ 2. दात 3. टाळू 4. पडजीभ 5. जीभ**

## ओठ आणि टाळू यातील व्यंगामुळे होणारे परिणाम

टाळू आणि / अथवा ओठ विभागलेले असणे म्हणजे काय हे आपण पाहिले.  हे विभाजन जर पूर्ण; म्हणजे टाळूपासून ओठापर्यंत; असेल तर त्यामुळे होणारे परिणाम हे इतर अवस्था पेक्षा सर्वात जास्त असतात.

ह्या व्यंगामुळे वाचादोष आढळून येतात.  शिवाय खातेवेळी अन्न नाकावाटे बाहेर येते, त्यामुळे मुलाला अंगावर दूध पाजता येत नाही आणि मुल मोठे झाल्यावरही त्याच्या खाण्याकडे विशेष लक्ष पुरवावे लागते.

कान, नाक व घसा ह्यांच्या तक्रारी ह्या व्यंगांमुळे जास्त प्रमाणात आढळून येतात.  वारंवार सर्दी-खोकला होणे, कान वहाणे अशा तक्रारी ह्या मुलांमध्ये जास्त प्रमाणात  आढळून येतात. कानाच्या श्रवण दोषांचे प्रमाण जास्त प्रमाणात आढळून येते.

ह्या व्यतिरिक्त, नाकाच्या वाढीतही काही दोष आढळून येतात. नाकाचा पडदा एका बाजूस कललेला असला तर नाक वाकडे


दिसते. नाकाची पाळी चपट किंवा नकटी असलेली आढळून येते. अशा प्रकारच्या दोषांवर शस्त्रक्रिया करता येते.


ह्याशिवाय एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे, हे व्यंग बाहेरुन दिसून येत असेल तर त्यामुळे चेहऱ्यावर (दिसण्यावर) परीणाम होतो. मुलाचे मित्र-मैत्रिणी यावरून त्याला चिडवतात, त्याची चेष्टा करतात. मुलं त्यामुळे एकलकोंडे बनण्याची शक्यता वाढते. मुलाच्या मनावर त्याचा परिणाम होतो. त्याचा आत्मविश्वास वाढत नाही, एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होतो. हे सर्व टाळण्यासाठी योग्यवेळी उपचार करून घेणे हितावह ठरते.

ह्या व्यंगाचा परिणाम केवळ वाचादोष किंवा शारीरिक दोष यापुरता मर्यादित न रहाता त्याचे परिणाम मुलाच्या व्यक्तिमत्वावर, त्याच्या मित्र-मैत्रिणींशी असलेल्या संबंधांवर होणे शक्य असते. लहानपणी जर उपचार चालू केले तर असे अनिष्ट परिणाम कमी प्रमाणात आढळून येतात. उपचार न केल्यास त्याचे परिणाम त्याच्या खाण्यावर व पर्यायाने शारीरिक वाढीवर होतात. वाचादोषांमुळे मुल इतरांत मिसळत नाही, सहसा बोलणे टाळू लागते, याचा परीणाम त्याच्या व्यक्तिमत्वाच्या वाढीवर होतो.

उदाहरणार्थ, दहा वर्षाच्या एका मुलाच्या पालकांची तक्रार होती की, हा खूप हुशार आहे, पण हल्ली त्याला शाळेत जायला आवडत नाही. एकटा घरात वाचत बसतो, कोणाशी खेळत-बोलत नाही. तपासणीत असे आढळून आले की त्या मुलाची बुद्धी खूप चांगली होती मात्र त्याच्या बोलण्यात व ऐकण्यात दोष होता. त्याला हळू बोललेले ऐकू येत नव्हते व बोलतांना काही शब्द अशुद्ध उच्चारले जात होते. ह्यामुळे शाळेत त्याला शिक्षकांचे बोलणे नीट समजत नव्हते, त्यांच्या प्रश्नांना उत्तर देणे त्याला जमत नव्हते. शिवाय उंचीने चांगला असल्याने त्याला मागच्या बाकावर बसविले होते. इतर मित्र त्याची टिंगल करीत असत. त्यावर उपाय म्हणून तो एकटाच रहाणे पसंत करत होता. शाळेत जाऊन रोज शिक्षकांचा ओरडा खाणे त्याला आवडत नव्हते. म्हणून एकूण शाळेत जाणेच त्याला आवडत नव्हते.


ह्या व्यंगाच्या उपचार पद्धतीत शल्यचिकित्साशास्त्र व वाक्श्रवणशास्त्र ह्यांचा महत्त्वाचा भाग असतो.








शास्त्रक्रिये पूर्वी

शास्त्रक्रिये नंतर










शाश्त्रक्रिये पूर्वी


शाश्त्रक्रिये नंतर







शास्त्रक्रिये पूर्वी



शास्त्रक्रिये नंतर

कधीकधी मूल एक वर्षाचे झाले तरी बोलत नाही. बोलणे शिकण्यास उशीर झालातर त्यावर लवकर उपचार केल्यास त्याचे दुष्परिणाम टाळता येतात. मुल मोठे झाल्यावर मात्र ह्यामुळे न्यूनगंड निर्माण होऊ शकतो.

अश्यावेळी मुलाला बोलण्यास प्रोत्साहन द्यायचे असते.मनुष्य हा तसा आळशी प्राणी आहे. न बोलता जर काम होत असेल तर बोलण्याचे कष्ट का घ्यायचे? म्हणूनच मुलाला बोलायला भाग पाडावे, त्याला काय म्हणायचय ते आपण मोठ्याने बोलावे. खाणाखुणांना प्रतिसाद न देता बोलण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न घरच्यांनी करावा. मुलासोबत सतत बोलत रहावे.

काही वेळा मुल तोतरे — अडखळत किंवा खूप जलद गतीने बोलते. परिणामी त्याला काय सांगायचेय ते समजत नाही . अशावेळी मुलाला काही उपचार केल्यास हा दोष दुरूस्त होऊ शकतो.

# बोलण्याची क्रिया

आपण बोलतो म्हणजे काय करतो? वाचादोषांबद्दल माहिती करुन घेतांना आपण प्रथम बोलण्याच्या क्रिये बद्दल माहिती करुन घेणे आवश्यक आहे.

आपण बोलतो तेव्हा बऱ्याच शब्दांचा वापर करतो. ह्या शब्दांची फोड केल्यास त्यात वेगवेगळी अक्षरे असतात. उदाहरणार्थ, मुंबई या शब्दाची फोड केली तर 'म्उ-म्ब्अ-ई अशी होईल. हे सुटे अवयव म्हणजेच मुखावाटे उच्चारल्या जाणाऱ्या मूळ ध्वनींची चिन्हे. ह्या चिन्हांना 'वर्ण' म्हणतात. वर्णांची अक्षरे, अक्षरांचे शब्द, शब्दांचे वाक्य व वाक्यांचे परिच्छेद बनतात.

मराठी भाषेत एकूण ४८ वर्ण आहेत. त्यात काही स्वर आहेत तर काही व्यंजने. जे वर्ण स्वतंत्रपणे उच्चारले जातात त्यांना स्वर म्हणतात. उदाहरणार्थ. अ,आ. तर काही वर्णांच्या उच्चाराच्या वेळी स्वरांची मदत घ्यावी लागते. अशा वर्णांना व्यंजने म्हणतात. उदाहरणार्थ, क्,ख्. एकूण ४८ वर्णांपैकी १२ स्वर तर बाकी व्यंजने आहेत.

**स्वर**

अ,आ,इ,ई,उ,ऊ,ऋ, ऌ, ए,ऐ, ओ,औ

**व्यंजने**

क वर्ग - क्,ख्,ग्,घ्,ङ्

च वर्ग - च्,छ्,ज्,झ्,ञ्

ट वर्ग - ट्,ठ्,ड्,ढ्,ण्

त वर्ग - त्,थ्,द्,ध्,न्

प वर्ग - प्,फ्,ब्,भ्,म्

य्,र्,ल्,व्,ष्,स्,ह्,ळ्

या शिवाय एक बिंदू व दुसरा विसर्ग-

उदाहरणार्थ, आंबा, तंटा, अंत:करण, स्वत:

ह्या वर्णांच्या समूहाला वर्णमाला म्हणतात.

वर्णाच्या उच्चाराकरिता तोंडातील अवयवांचा उपयोग करावा लागतो. विशिष्ट वर्णांच्या उच्चाराकरिता विशिष्ट प्रकारची हालचाल करावी लागते. उच्चाराकरिता वापरलेल्या

अवयवांनुसार वर्णाचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. ते पुढील प्रमाणे-

कंठ्य वर्ण - अ,आ,क्,ख्,ग्,घ्,ङ्,ह्

तालव्य वर्ण - इ, ई,च्,छ्,ज्,झ्,श्

मूर्धन्य वर्ण - ऋ, ट्,ढ्,ड्,ट्,ण्,र्,ष्,ल्

दंत वर्ण - त्,थ्,द्,ध्,न्,ल्,स्

औष्ठ्य वर्ण - उ,ऊ,प्,फ्,ब्,भ्,म्

अनुनासिक वर्ण - ग्,न्,ब्,म्

कंठ तालव्य वर्ण - ए,ऐ

कंठोष्ठ्य वर्ण - ओ,औ


दंतोष्ठ्य वर्ण - व्

दन्त तालव्य वर्ण - च्,छ्,ज्,झ्

ठराविक अक्षरांच्या उच्चाराच्या वेळी विशिष्ट अवयव व त्यांची विशिष्ट प्रकारे हालचाल करावी लागते. उदाहरणार्थ, औष्ट्य वर्णाच्या उच्चाराच्या वेळी दोन्ही ओठ एकत्र येतात. तर दंत्य वर्णांच्या उच्चाराच्या वेळी ओठ विलग असतात पण जीभेचे टोक दातांना लावले जाते. म्हणून प्रत्येक वर्णांच्या उच्चाराची पद्धत समजावून घेणे आवश्यक आहे.

आता हे वर्गीकरण आपण आकृतीच्या साह्याने समजावून घेऊया.


आकृती 6




ह्या आकृतीत आपल्या तोंडातील अवयव दाखविण्यात आलेले आहेत.

औष्ठ्य वर्ण

आकृती 7





दोन्ही ओठांच्याद्वारे हवेचा प्रवाह बंद करून शब्दाच्या उच्चाराच्या वेळी हवा बाहेर टाकली जाते.

उदा० प्, ब .

दन्त्य वर्ण

आकृती 8





जीभेचा पुढील भाग वरच्या दाताच्या मागील भागास स्पर्श करतो.

उदा० त्, द्.

## मूर्धन्य वर्ण

आकृती 9





जीभेचे टोक दातांना स्पर्श न करता त्याच्या मागच्या भागास टेकविले जाते.

उदा० ट्, ठ्.

## तालव्य वर्ण

आकृती 10





जीभेचे टोक न वापरता जीभेचा पुढील भाग दातांच्या मागच्या बाजूस स्पर्श करतो.

उदा० च्, छ्.

## कंठ्य वर्ण

आकृती 11





जीभेचा मागील भाग टाळूच्या आतील (मागील) भागास स्पर्श करतो.

उदा० क्, ख्, ग्.

## अनुनासिक वर्ण

आकृती 12




शब्दोच्चाराच्यावेळी हवा नाकावाटेसुद्धा बाहेर टाकली जाते.

उदा० म्

## मराठी वर्णमाला

पुढील कोष्टकाद्वारे आपण वर्णांचे स्थान वर्गीकरण पाहूया.

| स्वर | व्यंजने | स्थान व वर्ण |
| --- | --- | --- |
| अ, आ | क्वर्ग, ह् | कंठ्यस्थान, कंठ्यवर्ण |
| इ, ई | च्वर्ग, य्, श् | टाळूस्थान, तालव्य वर्ण |
| ऋ | ट्वर्ग, र्, ळ् | मूर्धन्यस्थान, मूर्धन्य वर्ण |
| ऌ | त्वर्ग, ल्,स् | दंत्यस्थान, दन्तवर्ण |
| उ, ऊ | प्वर्ग | औष्ठ्यस्थान, औष्ठ्यवर्ण |
| ए, ऐ | व् | कंठ्यवर्ण व औष्ठ्यस्थान, |
| कंठ्योष्ठ्य्आ वर्ण. | | |
| ओ, औ | ज्, झ् | दन्त व औष्ठ्य, दन्तोष्ठ्य वर्ण. |

टाळू व ओठ ह्यांतील व्यंगावर शस्त्रक्रिया करता येते व त्यामुळे हे विभागलेले भाग पुन्हा जुळविता येतात. ओठांची शस्त्रक्रिया नऊ महिन्यांनंतर करतात. मुलाची शारिरीक रचना, ताकद इत्यादींवर ही शस्त्रक्रिया केव्हा करायची हे अवलंबून असते. शल्यचिकित्सकांस शक्यतो लवकर दाखवून त्याबाबत सल्ला घेणे इष्ट होय.

बोबडेपणा इतर काही कारणांमुळे असू शकतो. आपल्या मुलाची कोणती अक्षरे बरोबर उच्चारली जात नाहीत हे पालकांनी

शोधून त्या अक्षराच्या उच्चाराचा सराव करून घ्यावा. लहान मुले सराव करायला एका जागी बसणे कठीण असते, म्हणून खेळाच्या माध्यमातून त्यांच्या नकळत हे करावे लागते. पालकांच्यांच्या कल्पकतेची ह्यात कसोटी लागते.

# उपचार पद्धती

ओठ व टाळू ह्यांच्या व्यंगांमुळे निर्माण होणारे वाचादोष, आवाजातील दोष हे सुधारता येतात. ह्यासाठी जेव्हा उच्चार चुकीचे असतात तेव्हा ते बरोबर करण्यासाठी वेगवेगळे व्यायाम व उपचार पद्धती असतात.

ओठ वा टाळूत दोष नसलातरी काही मुले अशुद्ध बोलतात. शब्दोच्चार चुकीचे करतात. अश्यावेळी येथे दिलेली उपचार पद्धती उपयोगी ठरू शकते.

एखादा शब्द-अक्षर उच्चारतांना चुकत असेल तर तो शुद्ध करण्यासाठी त्या अक्षराचा उच्चार कसा करावयास हवा हे लक्षात घेणे जरुरीचे ठरते. त्यासाठी मागच्या काही भागात आपण शुद्ध उच्चाराच्या पद्धती पहिल्या. त्या वर्णाचा (अक्षराचा) उच्चार शुद्ध झाल्यानंतर त्या अक्षराचा एखाद्या श्ब्दात वापर करताना सुद्धा ते अक्षर बरोबर उच्चारणे हे शिकावे लागते. उपचार पद्धतीत अक्षरापासून सुरुवात करुन मग शब्द, नंतर वाक्य व नंतर परिच्छेद अशा पायऱ्या ठरविलेल्या आहेत.

आपल्या मुलाचे कोणते अक्षर चुकते आहे हे शोधून काढावे. मग त्यानुसार एक एक अक्षर घेऊन ते बरोबर उच्चारण्याची सवय करावी. मुलाला आपण आपल्या तोंडाची योग्य हालचाल करुन त्या अक्षराचा उच्चार कसा असावा हे दखवू शकतो. आरशाचा उपयोग करणे सुद्धा उपयोगी ठरते.

उदाहरणार्थ, नेहमीच्या बोलण्यात आपला मुलगा ठराविक अक्षर / शब्द अशुद्ध बोलतो असे लक्षात आल्यावर ते शब्द लिहून काढावेत. त्यात वारंवार चुकणारी अक्षरे कोणती ती शोधून काढावीत. नंतर ही अक्षरे बोलताना आपण कोणत्या अवयवांचा व कसा उपयोग करतो हे स्वत: बोलून पहावे. शिवाय यापूर्वी प्रत्येक अक्षर कसे उच्चारावे हे आकृतींमध्ये दाखविले आहेच. आरशासमोर बसून ही अक्षरे उच्चारावीत. मुलाला प्रथम ती अक्षरे कशी उच्चारायची ते दाखवून तशा पद्धतीने ती उच्चारण्याचा प्रयत्न करण्यास सांगावे. रोज किमान अर्धा तास तरी व्यायाम करावेत.

वेगवेगळ्या वर्णाचा उच्चार सुधारताना प्रथम वर्ण एकटाच असतांना त्याचा उच्चार सुधारतो नंतर शब्दांकडे वळतो. मग वाक्य व नंतर परिच्छेद.

वेगवेगळी अक्षरे शुद्ध बोलण्यास शिकल्यावर शब्दांकडे वळावे. अशा अक्षराचे वेगवेगळे शब्द लिहून काढावे. पुढे प्रत्येक अक्षराचे काही शब्द व वाक्य दिली आहेत. शब्दोच्चार बरोबर झाल्यावर वाक्यांकडे वळावे.

रोज नियमितपणे किमान २५-३० वेळा तरी हे शब्द - वाक्य बोलण्याची सवय करावी. एकदा अक्षरे शुद्ध झाल्यावर शब्दांची सुरुवात केली तरी अक्षराचा व्यायाम चालू ठेवणे हितावह ठरते. रोज सुरुवात करताना आधी अक्षरे मग शब्द व नंतर वाक्य उच्चारावीत.

# अभ्यास

पुढे काही शब्द व वाक्य दिलेली आहेत ह्या शिवाय प्रत्येकाने ह्या आधारे आणखी काही नवीन शब्द / वाक्य तयार करावीत.

**औष्ठ्य वर्ण**

प्, फ्, ब्, भ्, म्, उ, ऊ

**'प्'**

| | | | |
|---|---|---|---|
| पताका | पंखा | कपडा | तूप |
| पाणी | पैसा | पिंपळ | चप्पल |
| पिवळा | पान | कपाट | कपिला |
| पेरु | पीक | खूप | दुपार |

पूनमला पकडापकडी हा खेळ खूप आवडतो.

पेरु हे एक फळ आहे.

दुपारी तू पान खा.

मला खूप तूप घाल.

तू कपाटामागे लप.

कपडे कपाटात ठेवावेत.

**’फ्’**

| | | |
|---|---|---|
| फणस | फूल | फणी |
| फिका | कफल्लक | फेरफटका |
| कॉफी | माफी | फेरी |
| फराळ | फुगा | मैफल |

त्याने फुगा फुगविला.

संध्याकाळी फराळ झाल्यावर फेरफटका मारावा.

हा रंग फार फिका आहे.

फेरीवाल्याने आज फणसाचे गरे आणले.

त्याने मैफिलीत माफी मागितली.

**’ब्’**

| | | | |
|---|---|---|---|
| बटण | बंद | डबी | बाक |
| बेकार | बेफिकीर | बिजली | कंबर |
| कबजा | बी | बूट | लबाड |
| बियाणे | बाहुली | बांधव | |

ते बटण बंद कर.

बाळाला बाहुली फार आवडते.

बाकावरच्या डब्यात एक डबी आहे.

ते बूट माझे आहेत.

बबन बेबीबरोबर जा.

**’भ्’**

| | | | |
|---|---|---|---|
| भारत | भीती | भीम | भरत |
| भिंत | भालेराव | भूक | भेद |
| भाला | भुंगा | भेट | शुभदा |
| शम्भू | लाभ | शुभ | शुभांगी |

भारत माझा देश आहे.

कुत्रा ’भो भो’ करतो.

शुभदाला मी पेन भेट दिले.

दुपारी मला खूप भूक लागते.

त्या भांड्यात भात आहे.

**’म्’**

’म्’ हे अनुनासिक आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| मका | मैत्री | कमला | काम |
| मेनका | कमाई | मध | मोती |
| मुंगी | प्रमाणे | राम | कमी |

आकाशात मेघ जमा झाले.

तू नेमाने काम कर.

माणसाने कमी बोलावे व जास्त काम करावे.

मधमाशी मध गोळा करते.

माकड झाडावर उड्या मारीत होते.

**’उ’**

| | | |
|---|---|---|
| उखळ | उथळ | उटणे |
| उकळणे | उखाणा | उधाण |
| उंट | उंच | उडी |

आज उंच उडीची स्पर्धा आहे.

पाणी तापले की ते उकळते.

उंदीर हे गणपतीचे वाहन आहे.

वाळवंटात उंट पाहावयास मिळतात.

दिवाळीत आपण उटणे वापरतो.

**’ऊ’**

| | | |
|---|---|---|
| ऊन | ऊस | मनीमाऊ |
| चिऊ | स्काऊट | काऊ |

उन्हाळयात ऊन कडक असते.

ऊसाचा रस गोड असतो.

मनीमाऊ चोरून दूध पिते.

चिऊताई ’चिऊ-चिऊ’ करते.

## परिच्छेद

मनू आता रायगावात होता. ह्या गावी येऊन त्याला पंधरा वर्षे झाली. परंतु त्याची कोणाशी मैत्री नव्हती. तो झोपडीत रहात असे. चांगला विणकर म्हणून त्याची प्रसिद्धी झाली होती. मोठ मोठ्या श्रीमंतांच्या बायकांकडून त्याला काम मिळे. मिळालेले पैसे मोजणे एवढाच काय तो मनूचा आनंद होता. संध्याकाळ झाली की मनू थांबे. मग तो मिणमिण दिवा लावी. चुलीवर भाकर भाजी. मग तो त्याचे पैसे मोजत बसे. मनू चैन करत नसे, त्याचे कपडे फाटके असत, तो कोरडी भाकर पाण्याबरोबर खाई. आपण खूप पैसे गोळा करावेत असे त्याला वाटे. रोज पैसे मोजून ते वाढावेत असे त्याला वाटे.

**दन्त्य वर्ण**

त्, ट्, द्, ध्, न्, ल्, स्

**’त्’**

| | | | |
|---|---|---|---|
| तलवार | तेल | लतिका | लता |
| तुकाराम तिकडे | सतार | मत | |
| तूप | तपेली | ती | मातब्बर |
| नाते | तुळस | तार | सातारा |

लतिका सतार खूप छान वाजविते.

घरासमोर तुळस लावावी.

माणसाने उगीचच खंत करत बसू नये.

तू कोणाविरुद्ध तक्रार केलीस?

तुकारामाने खूप अभंग रचले.

**’द्’**

| | | | |
|---|---|---|---|
| दात | दगड | कदर | कैद |
| दुपार | चवदार | हौद | दरोडा |
| दूर | नांदी | मदत | खादी |
| दीर | दरबार | खाद्य | देखणे |

मंदिर उभारण्यासाठी खासदाराने खूप मदत केली.

मंदिरात देवदर्शनासाठी चला.

दरवाजाचे कुलूप काढ.

खादीचे कपडे चांगले असतात.

दुकानात भर दुपारी दरोडा पडला.

**’ध्’**

| | | | |
|---|---|---|---|
| धपाटा | कढी | धरण | धमनी |
| धूर | धुके | मध्य | मध |
| धाक | धोका | अधिकार | |

घरात थोरल्या माणसांचा धाक असतो.

धरणीमातेची रोज पूजा करावी.

लहान मुलांनी खूप धुमाकुळ घातला.

धमनीतून रक्त धावते.

धुपाच्या धुराने वातावरण सुगंधित झाले.

**’न्’**

| | | |
|---|---|---|
| नाटक | कान | कानेटकर |
| नमन | लहान | मनुका |
| नेमका | मान | मैना |
| मनीमाऊ | नीटनेटका | नैना |

कानेटकर हे महान नाटककार आहेत.

नाटक फारच लहान वाटले.

नैना नावेत बसून गेली.

मनीमाऊ चोरून दूध पिते.

त्याला खूप मानसन्मान मिळाले.

**’ल्’**

| | | |
|---|---|---|
| लहान | लबाड | लाड |
| लिंबू | कला | लूट |
| माला | लवकर | कमला |

आई आपल्या मुलांचे खूप लाड करते.

मला लाल रंग आवडतो.

काल लैला, नलिनी, कमलिनी, कमल ह्या लांबपर्यंत फिरुन आल्या.

लसूण आरोग्यास चांगला असतो.

कोल्हा हा लबाड प्राणी आहे.

**’स्’**

| | | |
|---|---|---|
| सकाळ | समाचार | कंपास |
| सुगरण | मसाला | मासा |
| सोनचाफा | कासव | लेस |
| सुळे | सून | चौसोपी |
| सुंदर | संजय | सुगंध |

माझी आई सुगरण आहे.

मासे पाण्यात रहातात.

सीताला आज खूप स्वप्ने पडली.

कासव खूप हळू चालते.

ससा जोरात पळतो.

## <u>परिच्छेद</u>

माशाच्या गळयातील सोन्याची साखळी सावत्र आईने गळयात घातली. ती तिने घालताच राजपुत्राचे प्राण गेले.

राजपुत्राच्या शरीरास अग्नी देणार इतक्यात प्रधानाचा मुलगा तिथे आला. त्याचे राजपुत्रावर खूप प्रेम होते. तो राजाला म्हणाला, ’हा देह जाळू नका, हा मला द्या, मला नाही म्हणू नका.’ राजा म्हणाला, ’जशी तुझी इच्छा’, सारी मंडळी निघून गेली. प्रधानपुत्राने तो देह घरी आणला. तो गावाबाहेरच्या रानात गेला. त्याने बागेच्या मध्यभागी एक इमारत बांधविली. लवकरच इमारत तयार झाली. तिथे एक सुंदर पलंग ठेवण्यात आला. त्यावर त्याचा (राजपुत्राचा) देह ठेवला. रात्री सावत्र आईने सोन्याची साखळी काढून ठेवली. तिचा डोळा लागला. इकडे राजपुत्र जिवंत झाला.

**मूर्धन्यवर्ण**

ट्, ठ्, ड्, ढ्, र्, ळ्, ऋ

**’ट्’**

| | | | |
|---|---|---|---|
| टाकळा | काटा | टाटा | खाट |
| टपटप | टापटीप | टोळके | लूट |
| लाट | टरबूज | कटक | नाटक |

संजयने कचरा पेटीत टाकला.

तिच्या पायात मोठा काटा बोचला.

समुद्राच्या लाटा पायावर येत होत्या.

उन्हाळ्यात टरबूज खावे.

त्या ट्रंकेत किमती वस्तू आहेत.

**’ठ्’**

| | | |
|---|---|---|
| काठी | माठ | ठेच |
| ठार | ठाकूर | ठोकळा |
| लाठीमार | ठो-ठो | ठुमकत |

त्याने तो ठोकळा उचलला.

त्या माठात पाणी भरले का?

धावताना मी ठेच लागून पडले.

काठीने मारू नये.

काल तिकडे लाठीमार झाला.

**’ड्’**

| | | | |
|---|---|---|---|
| डमडम | काडी | खडू | डमरु |
| नाडी | मडके | डाळ | डिंक |
| लडीवाळ | डोके | लाडकी | खडा |

डमरु डमडम वाजत होता.

कोंबड्याचा तुरा डौलदार असतो.

माणसाने खादाडपणा करु नये.

मनूबाबांचे आवडते मडके एके दिवशी फुटले.

फळ्यावर लिहितांना खडू वापरावा.

**’ढ्’**

| | | | |
|---|---|---|---|
| ढग | ढोकळा | ढेमसे | ढाल |
| कढी | अढळ | ढेकर | ढोल |

आकाशात अचानक ढग जमा झाले.

अनिलला ढोकळा फार आवडतो.

बक्षिसाची ढाल तिला मिळाली.

ढेमश्याची भाजी छान लागते.

ढगातून पाऊस पडतो.

**’ण्’**

| | | |
|---|---|---|
| पाणी | खाण | लोणी |
| नाणी | कर्णिक | आण |
| आपण | तोरण | रहाणीमान |

मी पाणी पिऊन झोपते.

इथे पूर्वी कोळशाची खाण होती.

खाण तशी माती.

तू लोणी खात जा.

सोन्याची नाणी पाहून मला खूप आनंद झाला.

**’र्’**

| | | | |
|---|---|---|---|
| रवा | रेवती | रहाट | रूप |
| रोधे | रेळे | रिते | राधिका |
| कारावास | दार | कैरी | चार |
| भारत | रेती | रीघ | करवत |

रेवती खूप रूपवती आहे.

आधी तू दरवाजा उघड.

कैरी पिकून आंबा होतो.

पलंगाला चार पाय असतात.

तिचे नाव राधिका आहे.

**’ष्’**

| | | |
|---|---|---|
| षट्कोन | कोष | रोष |
| वर्ष | दोष | वर्षा |

ही आकृती षटकोनाची आहे.

मधमाशीची अळी कोषात असते.

लतिकेच्या बोलण्यात दोष आहे.

मला आज आठ वर्षे पूर्ण झाली.

वर्षा माझी मैत्रिण आहे.

**’ळ्’**

| | | |
|---|---|---|
| माळ | चाळ | निळा |
| बाळ | जर्दाळू | बोळवण |
| काळा | खेळणे | रेळे |

ती मोत्यांची माळ छान दिसते.

कावळ्याचा रंग काळा दिसतो.

माईचा स्वभाव मायाळू आहे.

बाळाला ते खेळणे खूप आवडते.

मुले मैदानात क्रिकेट खेळत आहेत.

**’ऋ’**

ऋषी ऋग्वेद ऋचा

ऋषीमुनी अरण्यात रहातात.

ऋग्वेद हा एक वेद आहे.

ऋचा चांगली मुलगी आहे.

**<u>परिच्छेद</u>**

गदाधर, झाले ते ठीक झाले. तुझाच ग्रंथ जगात राहू दे. त्यातच माझा आनंद आहे. ग्रंथ लिहित असताना कितीदातरी माझ्या मनात येई, मी हे काय करीत आहे, कशाला ग्रंथ लिहित आहे? हृदयात कोणीतरी असे बोले. परंतु मी त्या वाणीकडे लक्ष दिले

नाही. गदाधर, तुझ्यावर उपकार म्हणून नव्हे, तर, माझा मोह जिंकण्यासाठी मी माझा ग्रंथ टाकून दिला. आसक्ती जिंकण्यासाठी अशा शेकडो ग्रंथांचे मोल द्यावे लागले तरी कमीच होणार आहे. गदाधर, तू खिन्न होऊ नकोस. राहू दे, तुझाच ग्रंथ जगात राहू दे. तुझ्या ग्रंथाची पूजा होईल. पंडित त्याला डोक्यावर घेतील. माझा गदा पुन्हा हसू दे. जगात कोणीही दु:खीकष्टी असू नये. हस, गदाधर, हस. असे म्हणून गदाधराला प्रेमाने मिठी मारली.

**तालव्यवर्ण**

च्, छ्, ज्, झ्, श्, य्, इ, ई

**’च्’**

| | | | |
|---|---|---|---|
| चार | चिमुकली | चिमणी | जाच |
| आचल | कच्चा | चमत्कार | नाच |
| चेतना | काच | कचरा | चन्द्र |

चिमणी ’चिवचिव’ करते.

कच्ची भाजी आरोग्याला चांगली असते.

कचरा नेहमी कचऱ्याच्या पेटीत टाकावा.

चिमुकल्या चित्राचा तिने मुका घेतला.

काचेची भांडी सुरेख दिसतात.

**’छ्’**

| | | |
|---|---|---|
| छत्री | छबी | छान |
| छंद | छाया | छिद्र |
| छगन | छेद | छुमछुम |

छायाचे काम नेहमी छान असते.

आमची छबी बोबडे बोल बोलते.

वाचन हा माझा छंद आहे.

ह्या गावात कोणी कोणास छळत नाही.

पावसाळ्यात आपण छत्री वापरतो.

**’ज्’**

| | | | |
|---|---|---|---|
| जेवण | लाज | जेवढा | जपान |
| जुने | जुगनु | जांभुळ | जीर्ण |
| जकात | लाजाळू | अर्जून | काजळ |

जुने ते सोने.

कपडे जीर्ण झाले की ते फाटतात.

जुन्याकाळी राजे राजवाड्यात रहात.

जपान हा एक देश आहे.

जांभूळ ह्या फळाचा रंग जांभळा असतो.

**’झ्’**

| | | | |
|---|---|---|---|
| झकास | झेप | झोप | झरा |
| झेल | झगा | झाड | झुळूक |

रात्री लवकर झोपावे.

जांभळाचे झाड उंच असते.

वाऱ्याची एक झुळूक आनंद देऊन गेली.

झरा खळखळ वहातो.

हा झगा तुला शोभून दिसतो.

**’श्’**

| | | | |
|---|---|---|---|
| शुभ | शहाळे | शीत | शुकशुकाट |
| शीळ | शुद्ध | शांत | माशी |
| शरण | शेत | शाल | शहामृग |

तिकडे संध्याकाळी फार शुकशुकाट असतो.

गावात शेतकरी शेतात काम करतात.

शहामृगाची मान उंच असते.

शेवटी माणूस देवाला शरण जातो.

उन्हाळ्यात शीतपेये प्यावीत.

**’य्’**

| | | | |
|---|---|---|---|
| यवतमाळ | येवढा | येथे | युवक |
| यादव | योगिनी | यौवन | कायम |
| नायक | नायिका | नयन | युववाणी |

युववाणी हा युवकांचा कार्यक्रम असतो.

गावात दरवर्षी यात्रा भरते.

यवतमाळ हे एक गाव आहे.

येथे एवढा काळोख का आहे?

नायकाचा अभिनय छान वाटला.

**’इ’**

| | | | |
|---|---|---|---|
| इंद्र | इडली | इमानी | इनाम |
| इमान | इतर | इत्यादी | इतरेतर |

कुत्रा हा इमानी प्राणी आहे.

चांगल्या कामाबद्दल हे इनाम मिळत आहे.

इथे वह्या पुस्तके मोफत मिळतात.

तू आज इकडे कशी आलीस?

इंद्र देवांचा राजा आहे.

**’ई’**

| | | | |
|---|---|---|---|
| ईडलिंबू | आई | ताई | |
| माई | माईक | नाईक | पाईक |

ईडलिंबू हे एक फळ आहे.

ताई, माई बाहेर गेल्या आहेत.

आई रोज गाईची पूजा करते.

माईकमुळे आवाज मोठा होतो.

चंपा नाईक चांगली मुलगी आहे.

## परिच्छेद

पहाटे तो जागा झाला. त्याची झोप लवकर झाली. जाग आल्याबरोबर तो उठला आणि भाजीपाल्याच्या बागायतीवरुन चक्कर मारुन येण्यासाठी तो बागेकडे वळला. त्या बाजूला त्याने

पाऊल टाकले मात्र, लगेच गोळीबार चालू झाला. फ्रेंच सरकारने ही योजना शत्रुपक्षासाठी करुन ठेवली होती.

गावात पाणी नव्हते. नदीचे पाणी आटले होते. नाहीतर झरा झुळझुळू वहात होता. गावात चार विहिरी होत्या. त्यांना इतरवेळी चिक्कार पाणी असायचे. पण ह्यावेळी मात्र पाणी आटले होते. विहिरीवर पंप बांधावयाची योजना आखली. चार विहिरींना पंप लावले. मग गावात भरपूर पाणी आले.

कंठवर्ण

क्, ख्, ग्, घ्, ङ्, ह्, अ, आ

**’क्’**

| | | | |
|---|---|---|---|
| कमळ | कागद | किमया | कीर्ती |
| कुंकू | कंकण | लकेर | लकब |
| चाकर | चक्कर | मका | केस |
| नाका | मकई | कान | केसकर |

तिचे केस खूप लांब आहेत.

मला एक कोरा कागद दे.

मकईचे कणीस फार छान लागते.

तिच्या कपाळाचा कुंकू लाल रंगाचा आहे.

कारखान्यात एक चक्कर मारुन ये.

**’ख्’**

| | | | |
|---|---|---|---|
| खार | खटारा | खीर | खेळ |
| खेप | खेकडा | खोका | खूप |
| खेर | नख | लाख | खाणे |

नितीनने खूप खीर खाल्ली.

खोकल्यामुळे घसा दुखतो.

क्रिकेट हा माझा आवडता खेळ आहे.

मी रोज संध्याकाळी खेळ खेळतो.

गावात लोक खाटेवर झोपतात.

**’ग्’**

| | | | |
|---|---|---|---|
| गजानन | गणपती | गीत | गेंडा |
| गौरी | गुप्त | गुपचुप | गुरे |
| नाग | नागेश | सगुणा | नांगर |
| गोकुळ | लग्न | गंगा | गोफण |

गुळ गोड लागतो.

गंगा नदीचे पाणी शुद्ध असते.

नगर गावी माझी आजी रहाते.

नागपंचमीला नागाला दूध पाजतात.

शेतात बैल नांगरणीकरता जातात.

**’घ्’**

| | | |
|---|---|---|
| घर | घेरी | घुमट |
| अघटीत | बेघर | ओघ |
| घाम | मेघ | घोर |

आमचे घर खूप छान आहे.

देवळाचा घुमट खूप मोठा आहे.

त्याला चालता चालता घेरी आली.

मी वेळेवर घरी पोहचेन.

तिकडे काही घातपाताचे प्रकार घडले.

**’ह्’**

| | | | |
|---|---|---|---|
| हरिण | हेवा | हिरवा | हैराण |
| हुंकार | महाशय | काही | महान |
| मोह | लोह | लहर | कहर |

पोपटाचा रंग हिरवा असतो.

हिरा ही किमती वस्तू आहे.

लहान मुलांनी हट्ट करु नये.

हा कोणता महिना चालू आहे?

गाईचे हंबरणे ऐकू येत आहे.

**अ**

| | | | |
|---|---|---|---|
| अननस | अनावश्यक | अनाथ | अन्न |
| अजब | अकाली | अंतर | |

अर्जून

कथेचा अंत चांगला झाला.

अननस हे एक फळ आहे.

येथून काही अंतरावर आमचे घर आहे.

अनाथ मुलांना मदत करावी.

मी अनाथालयात जाऊन आले.

**’आ’**

| | | | |
|---|---|---|---|
| आज | आवाज | आत | आठवण |
| आंदोलन | आमरण | आजन्म | आकलन |

आज मी खूपच आनंदात आहे.

आत ऐवढी कसली गडबड चालू आहे?

आशाचा आरशापुढे कितीवेळ नट्टापट्टा चालू आहे?

तिला आईंची आठवण आली.

अन्यायाविरुद्ध आंदोलन चालू आहे.

## परिच्छेद

प्रवासाची गती संथ. गाड्यांचे डबे ठासून भरलेले. आपण नेमके कोठे चाललो आहोत याचा कोणाला पत्ता नव्हता. मधेच एका स्टेशनवर गाडी थांबली. नुकतेच सुटलेले कैदी उतरतात. तोच डब्याच्या दाराशी आकर्षक कपडे घातलेल्या स्त्रिया हजर! त्यांनी सर्वांना डब्याच्या एका टोकाला मांडलेल्या पार्टीस चलण्याची विनंती केली. हा खाना कोणी आयोजित केला आहे. आपले स्वागत कोण करीत आहे, कशासाठी करीत आहेत हे कोणालाच माहित नव्हते. संस्थेचे कार्यकर्ते दिलखुलासपणे हसत होते. खाणाऱ्यांना यात काहीतरी घोटाळा असला पाहिजे ह्याची कल्पनाही आली नाही.

## **कण्ठोष्ठ्य वर्ण**

व्, ए, ऐ

**’व्’**

| | | | |
|---|---|---|---|
| वरण | विकास | वाकडे | वेरुळ |
| विसावा | वीस | वैकुंठ | मवाळ |
| मावळे | कविता | कवी | नाव |

वेरुळ हे सर्वांच्या परिचयाचे आहे.

मावळ्यांनी रायगड जिंकला.

विकास योजना आपल्या देशात राबविल्या जातात.

कवीवर्य भा. रा. तांबे ह्यांची ती कविता आहे.

ते गाव नदीतीरी वसलेले आहे.

**’ए’**

| | | |
|---|---|---|
| एक | एकटा | एकदा |

एक होता राजा.

एकदा तो एकटाच फिरत होता.

इथे एक मोठे झाड होते.

**’ऐ’**

ऐट ऐरण ऐरावत ऐकणे

काय ती त्याची ऐट!

हत्तीच्या अंगावर ऐरावत असते.

ऐरण कसे असते?

घोडा ऐटीत धावतो.

## <u>परिच्छेद</u>

श्वाइटझर म्हणाला, ’जोसेफ असं म्हणू नाही, रे, डॉक्टर त्याची पत्नी अन्मिशनरी या सगळ्यांचे चेहरे किती चिंताग्रस्त झालेत. आपल्या दृष्टीने युद्ध ही केवळ भाववाढीपेक्षा कितीतरी भयंकर घटना आहे. आमच्या माणसांचा जीव धोक्यात आहे. जखमी माणसांच्या वेदना, त्यांच्या किंकाळया येथे दूरपर्यंत ऐकू येत आहेत. आमच्या जीवाला स्वस्थता नाही समजत नाही का तुला?’ डॉक्टरांच्या जीवाला एवढा घोर असेल अशी जोसेफला कल्पना नव्हती. मग मात्र त्याने भाववाढीबद्दल तक्रार केली नाही.

**दन्तोष्ठ्य वर्ण**

ज्, झ्, ओ, औ

**’ज्’**

| | | |
|---|---|---|
| जात | जुगार | जेवर |
| जेठाणी | जेथे | |

माणसाची जात माणुसकी ही होय.

त्या माझ्या जेठाणी लागतात.

जेथे राघव तेथे सीता.

पाण्याला जीवन म्हणतात.

मी शाळेत जाऊन आले.

**’झ्’**

| | | | |
|---|---|---|---|
| झबले | झाकण | झिरपणे | झगा |
| माझे | झोप | नाझ | झेप |

रात्री लवकर झोपावे.

माझे पुस्तक मला परत दे.

ती झाकणी कोठे गेली.

मातीत पाणी झिरपते.

माझा झगा सुंदर आहे.

**’ओ’**

| | | |
|---|---|---|
| ओंडका | ओरडणे ओढा | |
| ओक | ओला | ओत |

ओढ्याचे पाणी झुळुझुळू वाहते.

गावाबाहेर एक ओढा आहे.

उन्हाळयात ओढ्याचे पाणी आटते.

हत्ती ओंडके वाहून नेतो.

त्याचे आडनाव ओक आहे.

**’औ’**

| | | |
|---|---|---|
| और | औरत | औत |

त्याची ऐट काही औरच होती.

पहाटे भैरुने औत जोडले.

## परिच्छेद

प्रकाशाचा झोत छपराच्या काचेतून घरभर पसरला. माझ्या डोळ्यात अजूनही झोप होतीच. सकाळ झाली तरीही मला जाग कशी आली नाही? काय म्हणावं बरं या झोपेला? रात्री उशीरापर्यंत पुस्तक वाचत बसले म्हणून कदाचीत झोप झाली नसेल. चला, आता उठा. पाणी पिंपात ओतावे लागेल. शेजाऱ्यांचे ओरडणे सुरु झाले होतेच. सगळयांच्या तऱ्हा काही औरच. पाणी भरताना सुद्धा सकाळी सकाळी भांडतात. खरे तर शांतपणे काम केले तर किती बरे होईल. सुखशांती कशी सुखाने नांदेल. पण ह्यांना आरडाओरड्यातच काय और मजा वाटते हे देवास ठाऊक!

एखाद्या वर्णाच्या शुद्ध उच्चाराकरिता वरीलप्रमाणे श्ब्द-वाक्य-परिच्छेद ह्यात त्या वर्णाच्या उच्चाराचा सराव करावा. आतापर्यंत दिलेली उदाहरणे ही वानगीदाखल आहेत. त्यावर आधारीत आणखी काही शब्द व वाक्य समूह तयार करावीत.

## आवाजातील दोष व त्यावरील उपचार

आता आवाजात जर काही दोष असतील तर ते कोणकोणत्या प्रकारचे असतात व त्यावर उपाय कोणते ते पाहूया.

टाळूतील व्यंगामुळे आवाजात किनरेपणा येतो. म्हणजेच, आवाज नाकातून येतो. याचे कारण म्हणजे, आपण बोलतांना हवा तोंडावाटे बाहेर सोडतो व नाकातून जाऊ देत नाही. परंतु टाळूत काही व्यंग असेल तर हवा नाकावाटे निघून जाते व आवाज नाकातून येतो.

शस्त्रक्रिया केल्याने कापलेले वा विभागलेले टाळू जोडले जाते. परंतु तरीही स्नायूंना हवा नाकावाटे न जाऊ देण्याची सवय करावी लागते. ह्यासाठी वेगवेगळे व्यायाम असतात. हे व्यायाम सातत्याने व नियमितपणे करणे जरुरीचे असते.

हे व्यायाम पुढील प्रमाणे -

१. अंगठ्याने टाळूवर हळूवारपणे बोट फिरविणे.

२. छोटा चमचा (उलटा) घेऊन त्याने जीभ मागे ढकलणे.

३. पाणी पितांना नळीने प्यावे.

४. नळीने साबणाच्या पाण्याचे फुगे काढणे.

५. फुगा फुगविणे.

६. बासरी, बाजा यासारखी वाद्ये वाजविणे.

७. शिट्टी वाजविणे, फुंकर मारणे.

हे व्यायाम रोज करणे जरुरीचे आहे. पण काहीवेळा मुले ह्याचा कंटाळा करतात. म्हणून पालकांनी हे त्यांच्याकडून करवून घेणे जरुरीचे असते. त्याकरिता आपणही त्याच्याबरोबर व्यायाम करावेत किंवा हे व्यायाम खेळता खेळता करुन घ्यावेत.

ह्या व्यतिरिक्त इतर काही व्यायाम करणे जरुरीचे असते. बोलण्याकरिता वापरल्या जाणाऱ्या अवयवांचे हे व्यायाम. जीभ, ओठ, टाळू ह्यांची हालचाल हवी तशी करणे शक्य होण्याकरीता हे व्यायाम आहेत.

जीभेचे व्यायाम

● जीभ आतबाहेर भरभर करणे.

● जीभ एका बाजूने दुसऱ्या बाजूस फिरविणे. (डावीकडून उजवीकडे)

● जीभ तोंडात गोलगोल फिरविणे.

ओठांचे व्यायाम

● ओठ फाकविणे व मिटणे.

● ऊ-ई म्हणणे.

● दीर्घ श्वास घेऊन श्वास सोडतांना ई म्हणणे.

● दीर्घ श्वासावर अ म्हणणे.

● दीर्घ श्वासावर आ म्हणणे.

● एक ते दहा आकडे लांबवून म्हणणे.

उदा. ए---क दो---न.

# साधन सामुग्रींची सूची

१ आरसा

२ चमचा

३ फुगा

४ स्ट्रॉ

५ कागद - पेन्सिल

६ ग्लास - पाणी

७ पिपाणी - बासरी

८ मेणबत्ती

# प्रकरण ३

## वाचादोषावर उपचार पद्धती:

वाचादोषाबद्दल आपण विचार केला व त्याचे प्रकार तशीच कारणे पाहिली. आता ह्यावर उपचार कसे केले जातात हे पाहूया.

ह्या दोषांवर औषधोपचार नाहीत तर उपचारांची गरज असते. हे उपचार सातत्याने करणे महत्त्वाचे असते. तसेच लवकरात लवकर उपचार सुरु करावेत.

सर्व प्रथम आपल्या मुलाची लक्षणे लिहून काढावीत. तज्ञांचा सल्ला घ्यावा. उपचारपद्धती जास्त दिवस चालते तेव्हा न कंटाळता नेटाने ती चालू ठेवणे गरजेचे असते. शिवाय मुल जर लहान असेल तर ते एका ठिकाणी बसून उपचार करवून घेत नाही. म्हणून खेळातून त्याच्याकडून ते करवून घेणे हे पण एक आव्हानच ठरते. मुलापेक्षा पालकांमध्ये चिकाटी असावी लागते. पालकांनी संयमी रहावे लागते.

तसेच रोज केलेले उपचार, दिसून आलेले बदल वैगरेची नोंद एका नोंदवहीत ठेवावी. शक्य असल्यास बोलणे रेकॉर्ड करावे म्हणजे त्यात झालेले बदल ऐकता येतात.

तज्ञांकडून उपचार चालू असतांना घरीसुद्धा ते चालू ठेवणे अत्यंत महत्त्वाचे असते.

उपचारपद्धतीत शब्द कसे उच्चारायचे हे शिकवले जाते. तसेच खाणाखूणा न करता शब्द बोलून संवाद साधायचा प्रयत्न करावा लागतो. आधी आपले बोलणे मुल तसेच्या तसे बोलायला लागते. पण नंतर त्या मुलाला स्वत: काय सांगायचे ते सांगता येण्यासाठी त्याची शब्दसंपत्ती वाढावी लागते. अनुकरणाने सुरुवात झाली तरी नंतर मुलाने स्वत:चे शब्द वापरायला लागणे महत्त्वाचे असते.

मुलाची होणारी प्रगती नोंद करुन ठेवली तर त्याचा उपयोग उपचार पद्धती साठी पण होतो. मुलाच्या नकळत हे उपचार करता येतात. मुलाचे वय जर लहान असेल तर त्याच्या कलाकलाने वेगवेगळ्या युक्ती-प्रयुक्तीने त्याच्याकडून हे करवून घ्यावे लागते.

ह्या पुस्तिकेत दिलेली उपचारपद्धती घरी करून घेता येण्यासाठी मार्गदर्शक ठरावी अशी आशा आहे. पण तरीही तज्ञांचा सल्ला घेणे हितावह ठरेल.

# सारांश

असलेल्या दोषावर शक्य तितक्या लवकर काळजीपूर्वक उपचार केल्याने त्याचे परिणाम कमीत कमी करण्यात यश हे जरुर मिळते. ह्याकरिता चिकाटीने उपचार चालू ठेवावे. ह्यावर जेवढे लवकर उपचार केले जातील तेवढे त्यामुळे होणारे अनिष्ट परिणाम आटोक्यात राहतील. हे तर खरेच म्हणूनच लवकरात लवकर अशा दोषावर वैद्यकीय सल्ला घ्यावा अशी पालकांना विनंती आहे. मुलावर केल्या जाणाऱ्या उपचारात कुटुंबातील सर्वांचे सहकार्य असणे अत्यावश्यक असते. सर्वांनी ह्यासाठी मदत केल्यास ह्यावर मात करणे सहज शक्य आहे.

आलेल्या समस्येला धैर्याने तोंड देणे जरुरीचे असते. अशा दोषांबाबत शास्त्रीय ज्ञान करुन घेऊन त्याला हिंमतीने तोंड दिले तर त्यावर आपण सहज मात करु शकू. आम्ही सर्व आपल्या मदती करिता आहोतच.

**Dr Sujata More-Chavan,**
Assistant Professor.
BSc. MA,MSW. PGDip(Human Rights) PhD(LAW), India (t) +91 98679 34108
(e) drsujatachavan61@gmail.com
sujata.chavan@tiss.edu



Professional Experience:

---

- Tata Institute of Social Sciences, Mumbai Asst. Professor.(November 2013-Present)

- Family Court, Mumbai
Marriage Counsellor (October 1989-November 2013) (24 Years)

- Tata Memorial Hospital, Mumbai
Head of Social Work Department (November 1986- September 1989)

- GT Hospital, Mumbai
Medical Social Worker (January 1984 - November 1986)

- Plastic Surgery Dept., KEM Hospital, Mumbai Speech Therapist (June 1983 - January 1984)

- Paediatrics Dept., KEM Hospital, Mumbai Medical Social Worker.(May 1983 - January 1984)

# Publications


———————————


- Speech Therapy for Cleft Lip and/or Cleft Palate (1986, Republished 1998). [ Marathi, English, Hindi, Gujarathi]
- Role of Medical Social Worker in a Hospital Setup (1986) [English]
- Therapies for Cancer Patients (1988) [English]
- Role of Marriage Counsellor in a Judicial Setup (1993) .[English]
- Notes on Hindu law for LLM Students (1996) .[English]
- “Vihahawed” : Marriage Counselling (2000, Granthali Publication). [Marathi]
- “Saptapadi “: Pre Marriage Counselling (2011). [Marathi]
- Dos and Don’ts for Parents with Matrimonial Disputes (2013). [English]
- “Khau Anande” , 2016.
- “वाचादोषावर मात : ओठ व टाळू त्यांचे व्यांग”, पालकाांकररता मागदर्क पसु ति् का, 2016
- Family Court - Act and Procedure (1993, Republished 2016, esahitya Publication) [Marathi]

“ Kutumb Nyayalay “, 2017

- “Custody of Children in Matrimonial Disputes” (2017, Studium Press) .[English]
- “संकलन अनुभवांचे”, 2018
- “Khau Anande. Chatni special ”, 2018,


“Trainer’s manual on communication skills” (2018, Studium Press). [English]









डॉ. सुजाता चव्हाण यांची ई साहित्यवर उपलब्ध अन्य ईपुस्तके


कव्हरवर एक क्लिक करताच पुस्तक उघडेल.











डॉ. सुजाता चव्हाण यांची ई साहित्यवर उपलब्ध अन्य ईपुस्तके

कव्हरवर एक क्लिक करताच पुस्तक उघडेल.



# ई साहित्य प्रतिष्ठानला तेरा वर्ष झाली.
# डॉ. सुजाता चव्हाण यांचे हे अकरावे पुस्तक.

डॉ. सुजाता चव्हाण या विख्यात कुटुंब कायदे तज्ञ आहेत. त्या हा विषय TISS मध्ये शिकवतात. आणि त्याचबरोबर अनेक आघाड्यांवर त्या सामाजिक कार्य व समुपदेशन करत असतात. टाटा मेमोरिअल, मुंबई हायकोर्ट, टाटा सामाजिक विज्ञान संस्था अशा अनेक संस्थांवर त्या आहेत. त्यांच्या विषयातील त्या एक प्रमुख लेखिका आहेत. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण सुजाताजी आपली अनेक पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते.

मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३०), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(३), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री.

विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(२४), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१३), अंकुश शिंगाडे(१३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(४) पंकज कोटलवार(२) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(२) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

**आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।**

**दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।**